# University of Mumbai

परीक्षा विभाग/
वाणिज्य निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८

क्र.परीक्षा/ वाणिज्य निकाल कक्ष/६२२/२०१६

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या विधी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक यांना सुचित करण्यात येते की, एप्रिल/मे, २०१६ (प्रथम सत्र २०१६) मध्ये घेण्यात येणाऱ्या विधी पदवी व व्यवस्थापन पदवीत्तर परीक्षेच्या खालील नमुद केलेल्या शिक्षणक्रमाच्या परीक्षा प्रवेश अर्ज muexam.in या वेब लिंक वरून Online घेण्यात येणार आहे.

1) L.L.B.( 3 year Degree Course)

2) L.L.B./B.L.S (5 year Degree Course)

3) M.M.S.(Sem.III)(CBSGS) (Repeater)(2014-2015 Pattern)

4) M.M.S.(Sem.IV)(CBSGS) (Regular)(2014-2015 Pattern)

वरील अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज muexam.in या वेब लिंक वरून Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| अ. क्र. | परीक्षा शुल्क | Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारखा | Form Submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | ०८/०२/२०१६ — १९/०२/२०१६ | २३/०२/२०१६ पर्यंत |
| २. | विलंब शुल्क रू. १००/— सहित | २०/०२/२०१६ — २४/०२/२०१६ | २६/०२/२०१६ पर्यंत |
| ३. | अतिविलंब शुल्क रू. ५००/— सहित | २५/०२/२०१६ — २९/०२/२०१६ | ०३/०३/२०१६ पर्यंत |

वर नमुद केलेल्या तारखांचा तपशीलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील वरील नमुद केलेल्या परीक्षांसाठी प्रविष्ठ होण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेश अर्ज muexam.in या वेब लिंक वर Online भरून ते आपल्या महाविद्यालयाच्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षा प्रवेश अर्जांची व Form Submission Report ची प्रिंटस् काढून,परीक्षा अर्जांसोबत विद्यार्थ्यांचे मागिल सत्राचे /परीक्षांचे गुणपत्रिकांच्या छायांकित (गुणपित्रका संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी साक्षांकित केलेल्या असणे आवश्यक आहे.) प्रती जोडून हे अर्ज, Form Submission Report ची प्रिंट व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावी. पोस्टाने अथवा कुरिअरने स्विकारले जाणार नाहीत.

परीक्षा अर्ज विद्यापीठात जमा करताना हया अर्जांचे सत्र निहाय असे गठ्ठे बांधूनच विद्यापीठात जमा करावे. जेणेकरून हया अर्जांची छाणणी करणे सुलभ होईल.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता (०३/०३/२०१६ रोजी सायं.६ वा.)Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाहीत या बाबींची नोंद घेण्यात यावी.

जे विद्यार्थी द्वितीय सत्र २०१५ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण झाले असतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल अश्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र २०१६ मध्ये होणाऱ्या या परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज ( Provisional Basis) त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीत म्हणजेच संबंधीत परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विहीत शुल्कासहीत सादर करावेत.

**ज्या विद्यार्थ्याचे परीक्षा आवेदनपत्र online पध्दतीने Inword झाले नाही तर त्या विद्यार्थ्यांने आपले परीक्षा आवेदनपत्र पारंपारीक पद्धतीने (Hard Copy स्वरूपात) वरील नमुद केलेल्या तारखांच्या वेळापत्रकाप्रमाणे भरून विद्यापीठाकडे पाठवावेत.**

तसेच M.M.S (Sem IV), Second L.L.B (Sem IV) & L.L.B (Sem VI) (3 year Course) आणि L.L.B/B.L.S (Sem VI) & (Sem X) (5 year Course) या परीक्षेसाठी नियमित म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्याच्या परीक्षा शुल्कामध्ये रू.२५०/— पदवी प्रमाणपत्र शुल्क भरणे अनिवार्य आहे.

(परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना मराठी (देवनागरी) नाव टाकणे बंधनकारक आहे व तेच नाव त्यांच्या पदवी (Degree) प्रमाणपत्रात छापण्यात येईल. अन्यथा चूक झाल्यास विद्यार्थी जबाबदार राहील.)

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व बाबींची संबंधीतांनी नोद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(Web Link :- muexam.mu.ac.in ➝ examination ➝ follow the instructions given on the page)

— सही —
(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. ०३ फेब्रुवारी, २०१६.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित
१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
१. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
२. सहायक कुलसचिव, रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित
१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ३२.
३. मा. प्र. कुलगुरू, मा. संचालक बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियत्रंक यांचे स्विय सहायक

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक